आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२८ एप्रिल २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- राज्यासह देशभरात लोकसभा निवडणुकीचा प्रचार टीपेला

- काँग्रेस खोट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा, तर, मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय देणारं नसल्याचा शरद पवार यांचा आरोप

- महिला क्रिकेटमधे सिलहट इथं झालेल्या पहिल्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा बांगलादेशावर ४४ धावांनी विजय

**आणि**

- येत्या दोन दिवसात, कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**<><><><><>**

राज्यासह देशभरात लोकसभा निवडणुकीचा प्रचार टीपेला पोचला आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कर्नाटकात बेळगाव, सिरसी आणि दावणगेरे इथं प्रचारसभांना संबोधीत केलं.

काँग्रेस खोट्या गोष्टी पसरवून लोकशाही कमकुवत करत असल्याचा आरोप मोदी यांनी बेळगांव इथं बोलताना केला. काँग्रेसच्या वोट बँकेच्या राजकारणामुळे राज्यातली कायदा सुव्यवस्था बिघडली आहे, केंद्र सरकारनं मंजूर केलेल्या भारतीय न्याय संहितेमुळे कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती सुधारेल, आपल्या सरकारनं छोट्या शेतकऱ्यांना मदत केली असं ते म्हणाले.

भारताला शक्तिशाली बनवण्याची तसंच सुरक्षा आणि विकासाची हमी त्यांनी सिरसी आणि दावणगेरे इथल्या सभांमध्ये दिली. केंद्रसरकारनं राबलेल्या योजनांचा

कर्नाटकातल्या जनतेला मोठा लाभ झाल्याचं ते म्हणाले. सत्ताधारी काँग्रेसनं अनुसूचित जाती-जमातींसाठीचा निधी इतर कामांसाठी वळवल्याचा आरोप त्यांनी केला. ७ मे रोजी मोठ्या संख्येनं मतदान करावं, असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><>**

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या उत्पादनाला न्याय देणारं नाही असा आरोप शरद पवार यांनी केला आहे. पवार यांनी आज अहमदनगरात शेवगाव इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. राज्यातले कांदा उत्पादक अनेक दिवसांपासून निर्यात बंदी उठवण्याची मागणी करत आहेत, मात्र या सरकारने केवळ गुजरात मधल्या शेतकऱ्यांना कांदा निर्यातीची परवानगी दिली अशी टीका त्यांनी केली.

हे सरकार सामान्य नागरिकांच्या प्रश्नाबद्दलही जागरूक नाही, नरेंद्र मोदी यांचा देशाच्या संसदीय लोकशाहीवर विश्वास नाही, त्यामुळेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही होत नाहीत असा आरोपही त्यांनी केला. सध्या परिवर्तनाची गरज आहे असं ते म्हणाले.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी उत्तर मुंबईला उत्तम मुंबई बनवण्याचा आपला निर्धार असल्याचं भाजपा नेते पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत आयोजित बातमीदारांशी बोलत होते. उत्तर मुंबईला आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वाहतूक व्यवस्था प्रदान करणं आणि उत्तर मुंबई प्रदूषणमुक्त करणं याला प्राधान्य दिलं जाईल, असं त्यांनी संगितलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज बार्शी इथं उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांच्या प्रचारासाठी सभा

घेतली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शेतकऱ्याला अडचणीत येऊ देणार नाही, असा निर्धार असल्याचं सांगत मत देण्याचं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

रायगड जिल्ह्यात निजामपूर इथं आज इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांची प्रचार सभा झाली. नरेंद्र मोदी यांच्यामुळे देश हुकूमशाहीकडे वळत असल्याचा आरोप गीते यांनी यावेळी केला.

<><><><><>

भारत निवडणूक आयोगाच्या ॲपवरच्या ताज्या आकडेवारीनुसार राज्यात परवा ८ लोकसभा मतदार संघांमधे झालेल्या मतदानाची सरासरी ६२ पूर्णांक ७१ शतांश टक्के आहे. यात सर्वाधिक ६४ पूर्णांक ८५ शतांश टक्के मतदान वर्धा मतदार संघात, तर सर्वात कमी ६० पूर्णांक ४९ शतांश टक्के मतदान नांदेड मतदारसंघात झालं आहे. अनेक मतदार संघामधे पुरुषांपेक्षा महिलांचं मतदान कमी आढळून आलं. पहिल्या टप्प्यात राज्यात सरासरी ६३ पूर्णांक ७१ शतांश टक्के मतदान झालं होतं.

<><><><><>

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण लातूर आणि बीड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

बांग्लादेशात सिल्हट इथं भारत आणि बांग्लादेश महिला क्रिकेट संघात झालेला पहिला टि ट्वेंटी क्रिकेट सामना भारतानं ४४ धावांनी जिंकला. या

सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतल्यानंतर, भारतानं निर्धारीत २० षटकात ७ बाद १४५ धावा केल्या. भारताच्या वतीनं यास्तिका भाटिया हीनं सर्वाधिक ३६ धावा केल्या.

विजयासाठी १४६ धावांचा पाठलाग करताना, कर्णधार निगार सुलताना हीच्या अर्धशतकी खेळीनंतरही बांग्लादेशाला ८ बाद १०१ धावाच करता आल्या. भारताच्या रेणूका सिंग हीनं तीन बळी घेतले.

पाच सामन्यांच्या या मालिकेतला दुसरा सामना ३० एप्रिलला होणार आहे.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं गुजरात टायटन्सचा ८ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना गुजरातनं निर्धारित २० षटकात तीन गड्यांच्या मोबदल्यात २०० धावा केल्या. त्यानंतर बंगळुरुनं विल जॅक्स याच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर केवळ १६ षटकांतच विजयासाठीचं २०१ धावांचं लक्ष्य पार केलं.

स्पर्धेत आता थोड्या वेळात म्हणजे साडेसात वाजता चेन्नई सुपर किंग्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात सामना होणार आहे.

या सामन्यात सनरायझर्स हैद्राबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

रत्नागिरी जिल्हा पोलीस दलातल्या १७ पोलीस अंमलदारांना २०२३ या वर्षातल्या प्रशंसनीय सेवेबद्दल पोलीस महासंचालकांचं सन्मानचिन्ह जाहीर झालं आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये दोन महिला अंमलदारांचाही समावेश आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी विजेत्यांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातले चार अधिकारी आणि सात अंमलदारांना पोलीस दलात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पोलीस महासंचालक कार्यालयानं सन्मानित केलं आहे. सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून या पॊलिसांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार विजेत्यांमध्ये  एका महिला अंमलदाराचाही समावेश आहे, अशी माहिती जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभकुमार अगरवाल यांनी दिली.

<><><><><>

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज रत्नागिरी जिल्ह्यातल्या मिरजोळे एमआयडीसी इथल्या मतमोजणी  केंद्राला भेट देऊन पहाणी केली. कुवारबाव इथल्या सामाजिक न्याय भवन इथल्या इव्हीएम वाटप केंद्रालाही त्यांनी भेट दिली. निवडणूक निर्णय अधिकारी एम देवेंदर सिंह यांनी यावेळी त्यांना सविस्तर माहिती दिली.

<><><><><>

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मुंबईतल्या प्रत्येक मतदारानं मतदान करावं, असं आवाहन मुंबईतल्या रेल्वे स्थानकावरच्या ध्वनिक्षेपण यंत्रणांच्या माध्यमातून केलं जात आहे.

लोकसभा निवडणुकीत मुंबई उपनगर जिल्ह्यातली मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी 'स्वीप' च्या माध्यमातून जनजागृतीचे उपक्रम सुरू आहेत. मुंबईत लाखोंच्या संख्येनं लोक उपनगरी रेल्वेनं दररोज प्रवास करत असतात. ही बाब विचारात घेऊन मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातल्या कुर्ला विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी आखाडे- फडतरे

यांनी कुर्ला, टिळकनगर आणि चुनाभट्टी रेल्वे स्थानक व्यवस्थापक यांना अशा प्रकारे आवाहन करण्याचं पत्र दिलं आहे.

मुंबईतल्या सहाही मतदारसंघांमधे येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. या दिवशी मुंबईकरांनी मुंबईतच थांबून मनापासून मतदान करावं, असं आवाहन प्रसिद्ध गायक शंतनु मुखर्जी, ऊर्फ शान यांनी आज केलं. मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातल्या वांद्रे पश्चिम मतदारसंघात स्वीप कार्यक्रमांतर्गत आज सकाळी खार जिमखाना येथून 'व्होट टू व्होट रॅली' आयोजित केली होती. या रॅलीत गायक शान यांच्यासह नॅशनल कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात, तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली. तर विदर्भात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ४३ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. आज माथेरानमधे ३९ अंश, तर महाबळेश्वरमधे ३४ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली. मालेगाव, नाशिक, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, परभणी, नांदेड, बीड, अकोला, अमरावती, ब्रम्हपूरी, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ आणि जळगाव इथं ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानाची नोंद झाली. पुण्यात लोहगाव इथंही ४० अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, कोकणात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. याकाळात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**